पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.

मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती

कार्यपत्रिका क्रमांक - १७

**सभावृत्तांत**

दिनांक - **१२/०१/२०१८** वेळ - दुपारी **३.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा शुक्रवार दिनांक **१२/०१/२०१८** रोजी दुपारी **३.००** वाजता महापालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.लक्ष्मणशेठ सोपान सस्ते - सभापती**
२. मा.बाळासाहेब नामदेव ओव्हाळ - उपसभापती
३. मा.गावडे राजेंद्र तानाजी
४. मा.फुगे भिमाबाई पोपट
५. मा.मंगला अशोक कदम
६. मा.डब्बू आसवानी (हिरानंद)
७. मा.बनसोडे राजू विश्वनाथ
८. मा.अड.भोसले सचिन सुरेश

या शिवाय मा.लोणकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांच्या संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.२) व्यायामशाळा भाडेतत्वावर देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) व्यायामशाळा भाडेतत्वावर देणेबाबत –मा.राजेंद्र गावडे, मा.बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव.

विषय क्र.४) मनपाची डोळस तालीम व्यायामशाळा सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.५) व्यायामशाळा भाडेतत्वावर देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) पिंपळे निखल व्यायामशाळा चालविण्यास देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) व्यायामशाळा भाडेतत्वावर देणेबाबत – मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव.

दिनांक **२२/१२/२०१७** रोजी झालेल्या सभेचा **(कार्यपत्रिका क्रमांक १६)** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ठराव क्रमांक – ८५ विषय क्रमांक - ०१

दिनांक - १२/०१/२०१८ विभाग - क्रीडा

सुचक : मा.राजू बनसोडे अनुमोदक : मा.भिमाबाई फुगे

संदर्भ : मा.अति.आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/१०४२/२०१७, दि.२७/१२/२०१७

मा.अति.आयुक्त यांनी शिफारस केलेप्रमाणे -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पुणे डिस्ट्रीक्ट चेस असोसिएशन यांचे मान्यतेने, पिंपरी चिंचवड महानगर चेस असोसिएशन, चिंचवड, पुणे ३३ यांचे सहकार्याने माहे फेब्रुवारी २०१८ मध्ये मनपाचे श्री संत ज्ञानेश्वर क्रीडासंकुल, इंद्रायणीनगर, भोसरी पुणे – २६ येथे महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१७-१८ आयाजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.३,१४,२००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व ट्रॉफीज, मेडल्स, मानचिन्हे, पी.व्ही.सी.फ्लेक्स बॅनर्स, प्रमाणपत्रे, निमंत्रणपत्रिका, इ. खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस व सदर खर्चातील स्टेज, मंडप, टेबल, खुर्च्या, मॅट/चटई व्यवस्था, टेबल ८० नग, खुर्च्या ४०० नग करीता र.रु.५०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय, व विद्युत, स्पिकर, माईक व जनरेटर व्यवस्था करीता र.रु.५०,०००/- हा खर्च, विद्युत विभाग संबंधित क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.२,१४,२००/- हा खर्च महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ८६ विषय क्रमांक - ०२

दिनांक - १२/०१/२०१८

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी कॅम्प मृणाल शेजारी पिंपरी चिंचवड स्पोर्ट्स फौंडेशन व्यायामशाळा ही जी.के.इंटरप्राईजेस या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८७ विषय क्रमांक - ०३

दिनांक - १२/०१/२०१८

सुचक : मा. राजेंद्र गावडे अनुमोदक : मा. बाळासाहेब ओव्हाळ

संदर्भ : मा. राजेंद्र गावडे, मा. बाळासाहेब ओव्हाळ यांचा प्रस्ताव –

नेहरुनगर आण्णासाहेब मगर स्टेडियम मधील जलतरण तलावाच्या तळमजल्यावरील व्यायामशाळा ही न्यू भारत विकास सोशल फौंडेशन या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेबाबत मा.स्थायी समिती सभेकडे

शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता  ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८८ विषय क्रमांक - ०४

दिनांक - १२/०१/२०१८

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

मनपाची डोळस तालीम व्यायामशाळा ही व्यायामशाळा  डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी – ३९ या संस्थेस ११ महिने कराराने सेवाशुल्क तत्वावर कराराने चालविण्यास दिलेली आहे. सदर व्यायामशाळेच्या कराराची मुदत दि.३१/१२/२०१३ रोजी संपुष्टात आलेली आहे.  सदर व्यायाम शाळा डोळस तालीम व्यायाम मंडळ, भोसरी ३९ या संस्थेच्या ताब्यात आहे.  तरी मनपाची डोळस तालीम व्यायामशाळा ही व्यायामशाळा  डोळस तालीम व्यायाम मंडळ भोसरी – ३९ या संस्थेस दरमहा र.रु.२,०००/- सेवाशुल्क मनपाकडून घेऊन त्यांना ११ महिने कराराने चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता  ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८९ विषय क्रमांक - ०५

दिनांक - १२/०१/२०१८

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

मासुळकर कॉलनी येथील व्यायामशाळा लोकमान्य युवक मित्र मंडळ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता  ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९० विषय क्रमांक - ०६

दिनांक - १२/०१/२०१८

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

पिंपळे निलख येथील पिंपळे निलख ही व्यायामशाळा ओम साई फौंडेशन या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता  ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ९१ विषय क्रमांक - ०७

दिनांक - १२/०१/२०१८

सुचक : मा.बाळासाहेब ओव्हाळ अनुमोदक : मा.राजेंद्र गावडे

संदर्भ : मा.बाळासाहेब ओव्हाळ, मा.राजेंद्र गावडे यांचा प्रस्ताव –

सांस्कृतिक भवन, महेशनगर पिंपरी ही व्यायामशाळा जय भारत मित्र मंडळ या संस्थेस ११ महिने कराराने दरमहा र.रु.२,०००/- मनपाकडून घेऊन सेवाशुल्क तत्वावर चालविण्यास देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **लक्ष्मणशेठ सोपान सस्ते** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/२८/२०१८
दिनांक : १६/०१/२०१८



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.